(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**उत्तर प्रदेश राज्य आणि अन्य**

**विरुद्ध**

**गिरीश बिहारी आणि इतर**

**१४ फेब्रुवारी १९९७**

**[सरन्यायाधीश ए. एम. अहमदिया, न्यायमूर्ती सुजाता व्ही. मनोहर आणि न्यायमूर्ती के. वेंकटस्वामी,]**

**सेवाविषयक विधी :**

अखिल भारतीय सेवा (मृत्यू-तथा -निवृत्ती उपदान ) नियम, १९५८, आर. १६. एस.

सेवेचा विस्तार-सेवानिवृत्तीपूर्वी-मुदतवाढ प्रत्यक्षात लागू होण्यापूर्वी रद्द करणे-समाविष्टःअशी मुदतवाढ रद्द करणे, अवैध नाही.

**पुरावा अधिनियम १८७२: कलम ११५:**

प्रतिष्टम्भ- प्रायोज्यता - पक्षाची बाजू असलेल्या प्रतिष्टम्भामुळे स्थिती बदलली नाही - अधिनिर्णित केले की, प्रतिष्टम्भ फेटाळले गेले

**प्रशासकीय विधी :**

नैसर्गिक न्याय- दुसरी बाजू देखील ऐकूण -सुनावणी-सेवेच्या विस्ताराच्या आदेशा-सेवानिवृत्तीच्या नंतर - प्रत्यक्षात सेवानिवृत्तीच्या आधी मुदतवाढ रद्द झाली - अधिनिर्णित केले की- सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला कोणताही निहित अधिकार नव्हते - त्यामुळे, मुदतवाढीचा आदेश रद्द करण्यापूर्वी त्याला सूचित करण्याची गरज नव्हती.

उत्तरार्थी भारतीय पोलिस सेवेतून नियत सेवावधीने निवृत्त होणार होता. राज्यपालांनी अखिल भारतीय सेवा (मृत्यू-तथा -निवृत्ती उपदान ) नियम, १९५८ च्या नियम १६ अंतर्गत उत्तरार्थीच्या सेवेची मुदत त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपासून सहा महिन्यांसाठी वाढवण्याचा आदेश दिला. त्यानंतर, राज्यपालांनी त्यांचा मुदतवाढीचा सदर आदेश प्रत्यक्षात लागू होण्यापूर्वीच रद्द केला. उत्तरार्थीने केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणासमोर वरील आदेशाला या आधारावर आव्हान दिले की मुदतवाढ देण्याच्या आदेशामुळे उत्तरार्थीस  सहा महिन्यांच्या कालावधीसाठी सेवेत कायम राहण्याचा निहित अधिकार निर्माण झाला होता; उत्तरार्थीला सुनावणीची संधी न देता मुदतवाढ रद्द करण्याचा आदेश नैसर्गिक न्याय तत्त्वांचे उल्लंघन करणारा असल्यामुळे निष्फळ ठरला होता . न्यायाधिकरणाने उत्तरार्थीची  याचिका मान्य केली.म्हणून हे प्रस्तूत अपील

उत्तरार्थीच्या वतीने प्रतिष्टम्भाच्या  तत्वाबाबत  प्रतिवाद करण्यात आला. अपील मान्य करतांना या न्यायालयाने अधिनिर्णित केले की :

१.१. जोपर्यंत सेवेच्या विस्ताराचा आदेश कार्यान्वित होऊ शकत नाही, तोपर्यंत आदेशान्तर्गत धारकावर ते निहित होते. त्यामुळे मुदतवाढीचा आदेश रद्द करण्यापूर्वी त्यांची सुनावणी घेण्याची गरज नव्हती.उत्तरार्थीने सेवेत मुदतवाढ मागितली नव्हती. राज्य/अपीलार्थींची ही एकतर्फी कार्यवाही होती. उत्तरार्थीने हा प्रस्ताव स्वीकारला असेल किंवा नसेलही. हा आदेश लागू होईपर्यंत कोणताही निहित अधिकार निर्माण होऊ शकला नसता.जर मुदतवाढीच्या आदेशामुळे कोणताही अधिकार निर्माण झाला नसता, तर रद्द करण्याच्या आदेशाने असा कोणताही अधिकार मागे घेता आला नसता.

त्यामुळे सुनावणीच्या अधिकाराचा प्रश्नच उद्भवत नाही आणि नैसर्गिक न्यायाच्या नियमांचे उल्लंघन होत नाही.[५८- एफ-जी]

शर्वन कुमार झा विरुद्ध बिहार राज्य, [१९९१] पुरवणी १ एस. सी. सी. ३१० आणि अनुसूचित जाती आणि दुर्बल घटक कल्याण संघटना विरुद्ध कर्नाटक राज्य, [१९९१] २ एस. सी. सी. ६०४, लागू न करण्यायोग्य.

महाराष्ट्र राज्य आणि इतर विरुद्ध लोक शिक्षण संस्था आणि इतर, [१९७१] ई २ एस. सी. सी. ४१०, संदर्भित केले.

१.२ उत्तरार्थीच्या बाजूने कोणताही प्रतिष्टम्भ नाही. उत्तरार्थीने असा प्रतिवाद केला नाही की त्याने मुदतवाढीच्या आदेशामुळे कोणत्याही प्रकारे आपले स्थान बदलले आहे आणि म्हणूनच रद्द करण्याच्या त्यानंतरच्या आदेशाने उत्तरार्थीस कोणत्याही प्रकारे पूर्वग्रहदूषित होऊ शकत नाही. प्रस्तूत प्रकरणात प्रतिष्टम्भाचे तत्त्व आकर्षित होत नाही. [५८- एच, ५९-ए]

दिवाणी अपिलीय न्यायाधिकारक्षेत्र : दिवाणी अपील क्रमांक ७९५/१९९७.

मूळ अर्ज क्रमांक १६२/१९९६ मधील केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, लखनौ बेंचच्या दिनांक २१/०५/९६ रोजीच्या निकाल आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी उपस्थित वकील: अल्ताफ अहमद, अतिरिक्त महाधिकर्ता, एच.एन. साळवे, एम.सी. धिंग्रा आणि पी.सी. वर्मा.

उत्तरार्थी क्र. १ साठी समक्ष :

न्यायालयाचा निर्णय सरन्यायाधीश अहमदी यांच्याद्वारे देण्यात आला. अनुमती याचिका मान्य केली

उत्तरार्थी डॉ. गिरीश बिहारी, भारतीय पोलीस सेवेचे सदस्य हे ५ मार्च, १९९६ रोजी सेवानिवृत्त होणार होते आणि म्हणून ते ३१.३.१९९६ च्या दुपारपासून म्हणजेच शेवटच्या तारखेला नियत सेवावधीने सेवेतून निवृत्त होणार होते. २० मार्च १९९६ रोजी, उत्तर प्रदेशच्या राज्यपालांनी अखिल भारतीय सेवा (मृत्यू-तथा -निवृत्ती अपादान ) नियम, १९५८ (यापुढे "नियम" म्हणून संदर्भित) च्या नियम १६ अंतर्गत आदेशाद्वारे डॉ. गिरीश बिहारी यांच्या सेवेची मुदत त्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपासून ६ महिन्यांसाठी म्हणजे ३१/०३/१९९६ पर्यंत वाढवण्याचा आदेश दिला. २३ मार्च, १९९६ रोजी, राज्यपालांनी सर्वसाधारण कलम अधिनियमाच्या कलम २१ अन्वये अधिकारांचा वापर करून अपीलकर्त्याला मुदतवाढ देणारा २० मार्च १९९६ रोजीचा पूर्वीचा आदेश रद्द करणारा आक्षेपित आदेश जारी केला.

या प्रकरणाची परिस्थितीविशेष खालीलप्रमाणे आहेः

१८ ऑक्टोबर १९९५ रोजी, संविधानाच्या अनुच्छेद ३५६ मधील उद्घोषित केलेल्या कलमांतर्गत राष्ट्रपतींनी सरकारची सर्व कार्ये तसेच राज्यपालाकडे असलेले किंवा त्यांना वापरण्यायोग्य असलेले अधिकार स्वतःकडे घेतले. कलम ३५६ अंतर्गत अधिकार स्वीकारल्यानंतर, राष्ट्रपतींनी पुढील अधिसूचनेद्वारे राज्यपालांना त्यांच्या वतीने सर्व अधिकार वापरण्यास अधिकृत केले. १९ मार्च १९९६ रोजी निवडणूक आयोगाने राज्य विधानमंडळाच्या निवडणुका जाहीर केल्या आणि 'शासनासाठी आदर्श मार्गदर्शक तत्त्वे' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सूचना जारी केल्या. २० मार्च १९९६ रोजी, निवडणूक आयोगाने मुख्य सचिवांना लोक सभा आणि विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या घोषणेबद्दल संदेश पाठवले ज्यात नमूद केले आहे की बदली इत्यादींवर बंदी घालण्यासह आयोगाच्या स्थायी सूचना लागू झाल्या आहेत. मुख्य निवडणूक अधिकाऱ्याचे असे मत होते की उत्तरार्थीला सेवानिवृत्तीच्या तारखेच्या पलीकडे कायम ठेवण्याच्या आदेशासाठी निवडणूक आयोगाची पूर्व संमती आवश्यक आहे. निवडणूक

आयोगाने निर्देश दिले की २० मार्च १९९६ रोजी उत्तरार्थीला मुदतवाढ देणारा आदेश रद्द केला जावा कारण तो आयोगाने जारी केलेल्या आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणारा आहे. राज्यपालांनी महाधिवक्त्यांकडून सल्ला मागितला आणि त्यानंतर आक्षेपित आदेशाद्वारे २० मार्च १९९६ चा पूर्वीचा आदेश रद्द केला. उत्तरार्थीने आक्षेपित आदेशाला केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणासमोर या कारणासह आव्हान दिले की राज्यपालांनी त्यांच्या न्याय्य निर्णयावर कार्यवाही करण्याऐवजी निवडणूक आयोगाच्या अग्रक्रयधारित निर्देशानुसार काम केले आणि त्यामुळे आक्षेपित आदेश निष्फळ ठरला होता; २० मार्च १९९६ च्या आदेशाने ६ महिन्यांच्या कालावधीसाठी कायम राहण्याचा अधिकार निर्माण केला होता आणि त्यामुळे अपीलकर्त्याला सुनावणीची संधी न देता पारित केलेला आक्षेपित आदेश नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन केल्यामुळे निष्फळ ठरले आहे. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १५६ (२) अंतर्गत घटनात्मक सल्ला घेतल्यानंतर राज्यपालांनी त्यांच्या स्वतःच्या निर्णयाचा आणि विवेकबुद्धीचा न्याय्य पद्धतीने वापर केला होता आणि आक्षेपित आदेश १/०४/१९९६ पासून लागू होणार होता आणि त्यामुळे तोपर्यंत आदेशान्वये उत्तरार्थीस कोणत्याही प्रकारचा कोणताही निहित अधिकार निर्माण केला नव्हता, या आधारावर अपीलकर्ते उत्तर प्रदेश यांनी याचिकेचा बचाव केला.

न्यायाधिकरणाने अपीलकर्त्याच्या बाजूने आणि उत्तरार्थीच्या विरोधात सर्व महत्त्वपूर्ण प्रश्नांवर निष्कर्ष परत केले. न्यायाधिकरणाने असे म्हटले की, २० मार्च १९९६ रोजी प्रतिवादीला मुदतवाढ देणाऱ्या पत्रामुळे कोणताही निहित अधिकार निर्माण झाला नाही किंवा भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३११ (२) अंतर्गत संरक्षणाची तरतूद या प्रकरणाच्या परिस्थितीत उपलब्ध नव्हती, कारण मुदतवाढ रद्द करण्याचा आदेश कोणत्याही शिस्तभंगाच्या कारवाईद्वारे पारित करण्यात आला नव्हता. न्यायाधिकरणाने पुढे असे म्हटले की, निवडणूक आयोगाचा सल्ला आणि निर्देश हे अधिकारक्षेत्राबाहेर नव्हते किंवा बाह्य विचारांच्या आधारे मुदतवाढ रद्द

करण्याचा आदेश नव्हता. न्यायाधिकरणाने असे म्हटले की २३ मार्च १९९६ रोजी दिलेला आक्षेपार्ह आदेश हा मनमानी किंवा संविधानाच्या अनुच्छेद १४ आणि १६ चे उल्लंघन करणारा नाही. तथापि, न्यायाधिकरणाने असे निरीक्षण नोंदवले की आदेश पारित करण्यापूर्वी नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन केले गेले नाही कारण मुदतवाढीचा आदेश मागे घेण्यापूर्वी उत्तरार्थीची सुनावणी घेण्यात आली नव्हती. न्यायाधिकरणाने असे निरीक्षण नोंदवले की नैसर्गिक न्यायाची तत्त्वे पुढील प्रमाणे सूचित करतातः (१) दुसरी बाजू देखील एकूण घेण्याचे तत्व ; आणि (२) न्याय केवळ केला जाऊ नये तर तो स्पष्टपणे केला गेला पाहिजे. न्यायाधिकरणाने असे म्हटलेः

> " ज्या प्रशासकीय निर्णयामुळे प्रतिकूल दिवाणी परिणाम होतात, त्याने नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन केले पाहिजे, हे सर्वमान्य आहे.प्रस्तूत प्रकरणात, १/०४/१९९६ पूर्वी अर्जदाराला कोणताही उपार्जित अधिकार प्राप्त झालेला नव्हता हे खरे असले तरी, २०/०३/१९९६च्या मुदतवाढीच्या आदेशान्वये त्याला मिळालेला लाभ २३/०३/९६ रोजी तीन दिवसांच्या कालावधीत अचानकपणे काढून घेण्यात आला हे नाकारता येणार नाही. त्यामुळे प्रस्तूत प्रकरणात नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन झाले आहे, असे आमचे मत आहे.”

न्यायाधिकरणाने प्रशासकीय कायद्याच्या संदर्भात नैसर्गिक न्यायाची तत्त्वे लागू करण्याच्या पैलूवरील काही निर्णयांचा संदर्भ देण्यात आला आहे .महाराष्ट्र राज्य आणि इतर विरुद्ध लोक शिक्षण संस्था आणि इतर, (१९७१) २ एस. सी. सी. ४१० राज्याने संदर्भित केले होते. न्यायाधिकरणाने त्याच्या निर्णयाच्या समर्थनार्थ पाठवलेले दोन निर्णय ते म्हणजे श्रवण कुमार झा विरुद्ध बिहार राज्य, [१९९१] पुरवणी ३१० आणि अनुसूचित जाती आणि दुर्बल घटक कल्याण संघटना विरुद्ध कर्नाटक राज्य, [१९९१] २ एस. सी. सी. ६०४. श्रवण कुमार या प्रकरणाच्या बाबतीत, १७५ उमेदवारांची सहाय्यक शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती, परंतु

नियुक्तीचे आदेश जारी करणाऱ्या धनबादच्या जिल्हा शिक्षण अधीक्षकांना नियुक्ती करण्याचा अधिकार नव्हता या कारणावरून उपविकास आयुक्तांनी नियुक्तीचे आदेश रद्द केले. न्यायमूर्ती कुलदिप सिंग आणि न्यायमूर्ती के. रामास्वामी यांचा समावेश असलेल्या या न्यायालयाच्या खंडन्यायपीठाने असे निरीक्षण नोंदवले की उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यापूर्वी त्यांची सुनावणी घेण्याची संधी द्यायला हवी होती. त्यानुसार न्यायालयाने महान्यायअधीकर्ता यांना बिहार सरकारचे सचिव (शिक्षण) यांना उमेदवारांची सुनावणी घेण्याची संधी देण्या बाबत विचारणा करण्याचे आणि त्यांची सहाय्यक शिक्षक म्हणून वैधपणे नियुक्ती करण्यात आली आहे की नाही याचा निष्कर्ष काढण्याचे निर्देश दिले. जर कोणी प्रत्यक्षात शिक्षक म्हणून काम केले असेल तर त्याला किंवा तिला त्या कालावधीसाठी पगार मिळण्याचा हक्क असेल, असेही न्यायालयाने आदेश दिले.हे लक्षात घेणे आवश्यक आहे की सहाय्यक शिक्षक म्हणून नियुक्त झालेल्यांची सुनावणी घेण्याचे निर्देश देताना या न्यायालयाने नियुक्ती पत्रांच्या अनुषंगाने प्रत्यक्ष नियुक्तीच्या संदर्भात कोणताही दिलासा दिला नाही. तसेच नियुक्ती पत्रांनुसार त्या अपीलकर्त्यांना कोणतेही आर्थिक लाभ देण्याचे न्यायालयाने आदेश दिले नाहीत.पगार इत्यादी केवळ त्या उमेदवारांपैकी कोणी प्रत्यक्षात रुजू झाले असेल आणि काम केले असेल तरच देण्याचे आदेश देण्यात आले होते.तथापि, न्यायाधिकरणाने मुदतवाढीच्या आदेशानुसार उत्तरार्थी निवृत्तीनंतरही सेवेत राहिला असल्याचे मानले जाईल असे मत व्यक्त करून बरेच पुढे गेले आहे.

अनुसूचित जाती आणि दुर्बल घटक कल्याण संघटनेच्या प्रकरणात (उपरोक्त), कर्नाटक राज्याने कर्नाटक झोपडपट्टी (सुधारणा आणि साफसफाई) अधिनियमाच्या कलम ३ अंतर्गत झोपडपट्टी क्षेत्र म्हणून विशिष्ट क्षेत्राच्या संदर्भात अधिसूचना जारी केली होती आणि त्यानंतर आक्षेप ऐकल्यानंतर त्याच अधिनियमाच्या कलम ११ अंतर्गत संपूर्ण क्षेत्र झोपडपट्टी साफसफाई क्षेत्र म्हणून घोषित केले होते परंतु नंतर सुमारे तीन वर्षांनी पूर्वीची अधिसूचना रद्द केली आणि

केवळ खूपच लहान क्षेत्र झोपडपट्टी क्षेत्र म्हणून पुन्हा घोषित केले. झोपडपट्टी क्षेत्राच्या शेवटच्या अधिसूचनेत समाविष्ट नसलेल्या परिसरातील रहिवाशांनी असा युक्तिवाद केला की नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे आणि घटनेच्या अनुच्छेद १४ चे उल्लंघन करून त्यांना कायद्याच्या लाभांपासून वंचित ठेवण्यात आले आहे. प्रस्तूत प्रकरणात विचारात घेण्यात आलेल्या मुद्द्यांपैकी एक मुद्दा नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचा होता.कर्नाटक झोपडपट्टी (साफसफाई आणि सुधारणा) अधिनियमाच्या कलम ३ आणि कलम ११ अंतर्गत अधिसूचनेद्वारे ज्या भागांना अनुक्रमे झोपडपट्टी क्षेत्र आणि झोपडपट्टी साफसफाईचे क्षेत्र म्हणून घोषित करण्याची तरतूद होती, त्यामुळे त्या भागातील रहिवाशांच्या हक्कांवर परिणाम झाला होता. या न्यायालयाने असे म्हटले आहे की जेव्हा मूळ योजनेमध्ये कोणताही बदल करण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा आधीच्या आदेशामुळे प्रभावित झालेल्या व्यक्तींना संधी देणे आणि आवश्यक असणाऱ्या विशिष्ट कृतीचा अवलंब करणे हे अधिकाऱ्यांवर बंधनकारक असते. हे प्रकरण तथ्यांच्या आधारावर स्पष्टपणे वेगळे करता येते.न्यायाधिकरणाने स्वतःच असे प्रतिपादित केले आहे की, आदेश लागू होण्याच्या तारखेपूर्वीच तो रद्द करण्यात आल्यामुळे सेवेच्या विस्ताराच्या आदेशामुळे कोणताही अधिकार निर्माण झाला नाही. परिणामी, मुदतवाढीच्या आदेशामुळे किंवा मुदतवाढ रद्द करण्याच्या आदेशामुळे उत्तरार्थी प्रभावित झाला नाही.याउलट, अनुसूचित जाती आणि दुर्बल घटक कल्याण संघटनेच्या (उपरोक्त ) प्रकरणात न्यायालयाने असे म्हटले आहे की, कलम ३ आणि ११ अंतर्गत केलेल्या घोषणेमुळे तसेच घोषित धोरणातील केलेल्या कोणत्याही बदलामुळे संबंधित भागातील रहिवाशांच्या हक्कांवर परिणाम झाला होता.

न्यायाधिकरणाच्या स्वतःच्या निष्कर्षांनुसार, सेवेच्या मुदतवाढीचा आदेश कार्यान्वित होऊ शकत नाही तोपर्यंत, आदेशानुसार कोणताही अधिकार धारकाकडे निहित नव्हता, म्हणून मुदतवाढीचा आदेश रद्द होण्यापूर्वी त्यांची सुनावणी घेण्याची गरज होती हे मान्य करणे कठीण

आहे. उत्तरार्थीने  मुदतवाढ मागितली नाही.राज्य/अपीलकर्त्याची ही एकतर्फी कार्यवाही होती.उत्तरार्थीने  प्रस्ताव स्वीकारला असेल किंवा नसेलही.न्यायाधिकरणाने योग्यरित्या निरीक्षण केल्याप्रमाणे हा आदेश अंमलात येईपर्यंत कोणताही निहित अधिकार निर्माण होऊ शकत न .जर मुदतवाढीच्या आदेशाने कोणताही अधिकार निर्माण केला नसेल तर, रद्द करण्याचा आदेश असा कोणताही अधिकार काढून घेऊ शकत नाही. त्यामुळे सुनावणीच्या अधिकाराचा प्रश्नच उद्भवत नाही आणि आम्हाला नैसर्गिक न्यायाच्या नियमांचे कोणतेही उल्लंघन झाल्याचे दिसून येत नाही.

या न्यायालयासमोर, उत्तरार्थीच्या वतीने प्रतिष्टम्भाच्या तत्वाच्या प्रतिवादाबद्दल विनंती करण्यात आली. पुन्हा असा कोणताही आधार नाही की ज्यावर असा कोणताही युक्तिवाद घेता येईल . उत्तरार्थीच्या बाजूने कोणतीही वैधानिक प्रतिष्टम्भ नाही. उत्तरार्थी असे कथन करत नाही की, २० मार्च, १९९६ च्या मुदतवाढीच्या आदेशामुळे कोणत्याही प्रकारे त्यांच्या स्थितीत बदल झालेला नाही आणि म्हणून त्यानंतरच्या २३/०३/१९९६ च्या आदेशामुळे उत्तरार्थी कोणत्याही प्रकारे बाधित होऊ शकत नाही. प्रस्तूत प्रकरणामध्ये प्रतिष्टम्भाचे  तत्त्व कसे आकर्षित केले जाऊ शकते हे दिसून येत नाही.

अशा परिस्थितीत न्यायाधिकरणाचा निकाल बाजूला सारावा लागेल आणि २३ मार्च १९९६ चा आदेश कायम ठेवावा लागेल. अपील मान्य करण्यात येत आहे परंतु आम्ही खर्चाबाबत कोणताही आदेश देत नाही.

अपील मान्य करण्यात येत आहे

<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही.  तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल."

****